| MHNS070023272025 | **सत्र खटला क्र. ३२८/२०२५**<br>**निशाणी क्र. ४४ वरील आदेश**<br>नईम अख्तर अब्दुल करीम आणि इतर<br>वि.<br>सरकार |
| --- | --- |

०१. अर्ज वाचला. त्यावरील म्हणणे बघितले. कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले.

अर्ज थोडक्यात :—

०२. प्रस्तुतचा अर्ज **नईम अख्तर अब्दुल करीम** याने मालेगांव पवारवाडी पोलीस ठाणे येथील गुन्हा नोंदणी क्र. १८५/२०२५ मधील जप्त मुद्देमाल — Realme P1 6/128 Blue कंपनीचा मोबाईल हॅन्डसेट त्याचा आय.एम.ई.आय. नंबर ८६५४०७०७३४९३४९७ खटल्या दरम्यान परत मिळणेकामी केला आहे. अर्जदाराचा मोबाईल फोन पोलीसांनी जप्त केला असुन तो सध्या बंद अवस्थेत पोलीस ठाण्यात आहे. सदरचा मोबाईल फोन अर्जदाराच्या मालकीचा आहे. सदरचा मोबाईल फोन न वापरता तसाच पडुन राहील्यास निश्चीतच अर्जदाराचे नुकसान होईल. अर्जदार अटी शर्तीचे पालन करण्यास तयार आहे. अर्ज मंजुर करण्यात यावा.

०३. तपासणी अधिका—यांनी दिलेल्या जबाब निशाणी क्र. ४७ चे अवलोकन केले असता त्यामध्ये नमुद आहे की, अर्जदार हा स्वत: आरोपी क्र. ३ असुन त्यास व त्याचे साथीदारांना घातक अग्नी शस्त्र व त्यांचेकडे असलेल्या मोबाईल फोनसह पकडले असुन त्यांचेकडुन सदरची घातक अग्नी शस्त्र व मोबाईल फोन जप्त करण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे आरोपी अर्जदार याने मोबाईल फोनचे मालकी हक्क सबंधाने पोलीसांकडे कोणतेही कागदपत्र सादर केलेले नाहीत. सबब अर्जदार आरोपीस उपरोक्त मोबाईल फोन परत करण्यास त्यांची हरकत असल्याचे नोंदविले आहे.

०४.		अर्जदाराचा उपरोक्त मोबाईल फोन मालेगांव पवारवाडी पोलीसांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम १०९, ११८(१), ११८(२), १८९(२), १९१(३), १९०, ३५१(२)(३), ३(५) सह कलम ३/२५, ५/२७, ७/२५ भारतीय शस्त्र कायदा, १९५९ अन्वये दाखल गुन्ह्याच्या तपासात जप्त करण्यात आलेला आहे. अर्जदाराने मुद्देमालावरील मालकी दाखविण्याकरीता स्वत:चे आधारकार्ड आणि मोबाईल फोनचे बिलाची छायांकित प्रत दाखल केली आहे. दाखल कागदपत्रांवरुन अर्जदाराने Invoice AIMobile किल्ला नबी जान मिया चौक, मालेगांव येथुन दिनांक १३.१०. २०२४ रोजी रक्कम रुपये १५,०००/— ला उपरोक्त मोबाईल फोन स्वत :च्या नावे इनव्हाईस क्र. ६८० अन्वये खरेदी केल्याचे दिसुन येते. यावरुन अर्जदाराची मुद्देमालावरील प्रथमदर्शनी मालकी दिसुन येते.

०५.		अर्जदाराचा सदरील मोबाईल फोन न वापरता तसाच पडुन राहीला तर निश्चीतच अर्जदाराचे नुकसान होईल. अर्जदाराने मालकी हक्काबाबत कागदोपत्री पुरावा हजर केलेला आहे. तो अटी शर्तीचे पालन करण्यास तयार आहे. मुद्देमाल न वापरता तसाच पडुन राहील्यास निश्चीतच अर्जदाराचे नुकसान होईल.

०६.		अर्जदार अटी शर्तीचे पालन करण्यास तयार आहे. या सर्व बाबींचा विचार करता पुढीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## आदेश

१.	अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२.	खटल्या दरम्यान मालेगांव पवारवाडी पोलीस ठाणे येथील गुन्हा नोंदणी क्र. १८५/२०२५ मधील जप्त मुद्देमाल Realme P1 6/128 Blue कंपनीचा मोबाईल हॅन्डसेट त्याचा आय.एम.ई. आय. नंबर ८६५४०७०७३४९३४९७ **नईम अख्तर अब्दुल करीम** यास रक्कम रु. १५,०००/— (रु. पंधरा हजार मात्र)

क्षतीपुर्ती बंधपत्रावर पुढील अटींसह देण्यात यावा.

**अ.** मुद्देमालाच्या स्वरुपात कोणताही बदल करु नये.
**ब.** विक्री, गहाण, बक्षिस, भेट इत्यादी कोणत्याही प्रकारे मुद्देमालाची विल्हेवाट लावु नये.
**क.** सदर मुद्देमाल फोनमधील कुठलाही डेटा डिलीट करु नये किंवा त्यामध्ये कुठल्याही प्रकारे बदल करु नये.
**ड.** न्यायालय आदेश करेल त्यावेळेस मुद्देमाल न्यायालयासमक्ष हजर करावा.
**ई.** अर्जदाराने यापुढे सदर मोबाईल फोन कोणत्याही गुन्ह्याच्या कामी वापरले जाणार नाही याची दक्षता घ्यावी.
**फ.** तपासणी अंमलदाराने मुद्देमाल परत करण्यापुर्वी सदर मोबाईल फोनचे छायाचित्र घ्यावे आणि सविस्तर पंचनामा करावा.

३. अर्जदाराने क्षतीपुर्ती बंधपत्र संबंधीत पोलीस ठाण्यात द्यावे. त्याने बंधपत्र दिल्यावर त्यास मुद्देमाल देण्यात यावा.

YOGESH HEERALAL AMETA
Digitally signed by YOGESH HEERALAL AMETA
Date: 2026.04.20 17:06:36 +0530

मालेगांव.
दिनांक : २०.०४.२०२६.

**(यो. ही. आमेटा)**
अति. सत्र न्यायाधीश—२,
मालेगांव (नाशिक).